Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,
Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153
https://www.srjis.com/issues_data/231
Peer Reviewed & Refereed Journal, MAR-APRIL 2024, Vol- 12/82
https://doi.org/10.5281/zenodo.11076986

भारतातील आदिवासींचा राजकीय सहभाग: एक चिकित्सक अध्ययन

डॉ. अर्जुन उबाळे & श्री. गोरे पांडुरंग सिताराम
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्री. आसारामजी भांडवलदार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देगांव रंगारी, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग

Paper Received On: 20 MAR 2024
Peer Reviewed On: 28APRIL 2024
Published On: 01 MAY 2024

प्रस्तावना:-

नागरी संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी अशी आदिवासी समाजाची सर्वसामान्य व्याख्या केली जाते. सर्वसाधारणपणे जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यांत व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते तुरळक वस्ती करून राहतात. नागरी संस्कृतीचा त्याप्रमाणे वर्गश्रेणीबद्ध समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा 'संस्कृती' आदिवासींत आढळतात. आदिवासी जमाती जगभरात सगळीकडेच आढळतात. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. उदा. अमेरिकेत त्यांना 'रेड इंडियन्स' म्हणतात. ऑस्ट्रेलियात 'ॲबोरिजीन्स', युरोपीयन देशांमध्ये 'जीप्सी' तर आफ्रिकी आणि आशियाई देशांमध्ये त्यांना 'आदिवासी' म्हणून ओळखले जाते. आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो.[1]

भारतातील आदिवासी जमातींना काही मानवशास्त्रज्ञांनी त्यांना 'आदिवासी' शब्दाने संबोधले.[2] हट्टनने त्यांना प्राचीन (Primitive Tribe) जमाती म्हटले आहे.[3] तर एल्विनने बैगा जमातीला आदिस्वामी (Abotiginais) म्हटले आहे.[4] प्रसिद्ध

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

समाजशास्त्रज्ञ जी. एस. घुर्ये यांनी त्यांना तथाकथित आदिवासी (Socalled Aborigines) किंवा मागासलेला हिंदू (Backward Hindus) असे म्हटले.[5] तर स्वातंत्र्यपूर्व भारताच्या विविध जनगणना अहवालांमध्ये त्यांना वन्य जाती, पहाडी जमाती तसेच मागास जाती म्हणून संबोधले गेलेले आहे. तर स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेत त्यांची नोंद 'अनुसूचित जमाती' अशी करण्यात आलेली आहे. 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची देशातील एकूण लोकसंख्या 10.43 कोटी असून भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 8.6% लोकसंख्या ही आदिवासींची आहे.[6] आदिवासींच्या एकूण लोकसंख्येपैकी 89.9% लोकसंख्या एकूण व डोंगराळ भागात वास्तव्यास आहे. त्यामध्ये महानगरामध्ये त्यांची संख्या नगण्य आहे. भारतामध्ये 29 घटकराज्ये व 7 केंद्रशासीत प्रदेश आहेत त्यापैकी 30 प्रांतामध्ये आदिवासींच्या अनेक जमाती राहतात. आदिवासी विकास मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार देशामध्ये आदिवासी जमातींची संख्या एकूण 705 इतकी आहे. महाराष्ट्रात सह्याद्री, सातपुडा व गोंडवन विभागात आदिवासी जमातींचे अस्तीत्व आढळते.[7] महाराष्ट्र राज्यात धुळे, नंदुरबार, ठाणे, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, जळगांव, अमरावती, रायगड, नांदेड या जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या जास्त प्रमाणात आढळते. त्यात भिल्ल, वारली, गोंड, महादेव कोळी, कोकणी, गावीत, ठकार, कातकरी, कोरकू, कोलाम इत्यादी प्रमुख जमातींचा समावेश होतो. उपरोक्त प्रत्येक जमातीत सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व आर्थिक दृष्ट्या भिन्नता दिसून येते.[8]

अनुसूचित जमातींच्या सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणामुळे आणि सापेक्ष अलिप्ततेमुळे प्रचंड शोषणाला सामोरे जावे लागले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या चतु:सूत्रीवर आधारित कल्याणकारी लोकशाही शासन प्रणाली व सर्वसमावेशक राज्यघटनेचा स्वीकार केल्यामुळे समाजातील सर्वच घटकांच्या कल्याणाची जबाबदारी शासनावर आली आहे. घटनाकारांनी आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व आदिवासी समाजालाही राजकीय नेतृत्व करता यावे यासाठी राज्यघटनेत काही तरतुदी केलेल्या आहेत. त्यानुसार राज्यघटनेच्या कलम 330 नुसार लोकसभेमध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव

जागांची तरतूद केली आहे. त्याच बरोबर कलम 332 नुसार घटकराज्यांच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी जागा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. आदिवासी समाजाचे प्रतिनिधी संसदेत व विधानसभेत निवडून गेले पाहिजेत व आदिवासी समाजालाही राजकीय सहभाग घेता आला पाहिजे हा त्यामागचा हेतू होता. घटनात्मक राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून आदिवासी समाजाला प्रतिनिधित्व देण्यात आले. खालील सारणीत भारतातील विविध राज्यात आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभा निवडणूकीसाठी आरक्षित जागांची संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

सारणी क्र. 1 अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांचे राज्यनिहाय विभाजन[9]

अनु. क्र.	राज्य/केंद्रशासित प्रदेशाचे नाव	एकूण जागा	अनुसूचित जातीसाठी आरक्षित जागा	अनुसूचित जमातीसाठी आरक्षित जागा
	राज्ये			
1	आध्रपदेश	42	07	03
2	अरूणाचल प्रदेश	02	-	-
3	आसाम	14	01	02
4	बिहार	40	06	-
5	छत्तीसगढ	11	01	04
6	गोवा	02	-	-
7	गुजरात	26	02	04
8	हरियाणा	10	02	-
9	हिमाचल प्रदेश	04	01	-
10	जम्मू आणि कश्मिर	06	-	-
11	झारखंड	14	01	05
12	कर्नाटक	28	05	02
13	केरळ	20	02	-
14	मध्यप्रदेश	29	04	06
15	महाराष्ट्र	48	05	04
16	मनिपूर	02	-	01
17	मेघालय	02	-	02
18	मिझोराम	01	-	01

19	नागालॅन्ड	01	-	-
20	ओरिसा	21	03	05
21	पंजाब	13	04	-
22	राजस्थान	25	04	03
23	सिक्कीम	01	-	-
24	तामिळनाडू	39	07	-
25	त्रिपूरा	02	-	01
26	उत्तराखंड	05	01	-
27	उत्तरप्रदेश	80	17	-
28	पश्चिम बंगाल	42	10	02
केंद्रशासित प्रदेश				
1	अंदमान आणि निकोबार बेटे	1	-	-
2	चंदिगड	1	-	-
3	दादरा आणि नगर हवेली	1	-	01
4	दिल्ली	7	01	-
5	दमण आणि दीव	1	-	-
6	लक्षद्विप	1	-	01
7	पाँन्डेचेरी	1	-	-
एकूण जागा		**543**	**84**	**47**

वरील सारणीचे निरिक्षण करता असे दिसून येते की, देशभरात अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी लोकसभेसाठी एकूण जागांपैकी 47 जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या असून आरक्षित जागी अनुसूचित जमातीशिवाय इतर कोणत्याही जातीचा उमेदवार निवडणूक लढवू शकत नाही. देशाच्या सर्वोच्च विधीमंडळात आदिवासी समाजातील लोकांना आपल्या जनतेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी राजकीय आरक्षणामुळे प्राप्त झाली. त्याचाच परिपाक म्हणून विविध पंचवार्षिक निवडणूकांमध्ये लोकसभेवर आदिवासींमधील लोकप्रतिनिधी निवडून पाठविण्यात आलेले आहेत.

सारणी क्र. 1.2 लोकसभेतील सामाजिक प्रवर्गनिहाय जागा आणि आरक्षणाची स्थिती[10]

निवडणूक	वर्ष	अनु. जमाती	अनु. जाती	इतर	एकूण
पहिली लोकसभा	1952-1957	38 (7.12)	90 (16.88)	405 (75.98)	533
दुसरी लोकसभा	1957-1962	36 (6.89)	79 (15.13)	407 (77.96)	522
तिसरी लोकसभा	1962-1967	34 (6.46)	87 (16.53)	405 (76.99)	526
चौथी लोकसभा	1967-1970	38 (6.92)	85 (15.48)	426 (77.27)	549
पाचवी लोकसभा	1971-1977	41 (7.45)	84 (15.27)	425 (77.27)	550
सहावी लोकसभा	1977-1979	43 (7.74)	82 (14.77)	430 (77.47)	555
सातवी लोकसभा	1980-1984	43 (7.62)	87 (15.42)	434 (76.95)	564
आठवी लोकसभा	1984-1989	42 (7.43)	84 (14.86)	439 (77.69)	565
नववी लोकसभा	1989-1991	40 (7.51)	80 (15.03)	412 (77.44)	532
दहावी लोकसभा	1991-1996	44 (7.97)	81 (14.67)	427 (77.35)	552
अकरावी लोकसभा	1996-1997	42 (7.65)	81 (14.75)	426 (77.59)	549
बारावी लोकसभा	1998-1999	42 (7.72)	80 (14.70)	422 (77.57)	544
तेरावी लोकसभा	1999-2004	42 (7.42)	83 (14.66)	441 (77.91)	566
चौदावी लोकसभा	2004-2009	42 (7.19)	83 (14.21)	459 (78.59)	584
पंधरावी लोकसभा	2009-2014	48 (8.60)	84 (15.05)	426 (76.34)	558
सोळावी लोकसभा	2014-2019	46 (8.64)	83 (15.60)	403 (75.75)	532

वरील सारणीत लोकसभेतील सामाजिक प्रवर्गनिहाय निवडणूकीतील प्रतिनिधित्व दर्शवते. सुरुवातीच्या निवडणुकांमध्ये, आदिवासी लोकांचे प्रतिनिधित्व त्यांच्या संख्यात्मक प्रमाणापेक्षा तुलनेने जास्त होते. हे दुहेरी-सदस्यीय मतदारसंघाच्या पद्धतीमुळे असू शकते, ज्यामध्ये अनेक आदिवासी उमेदवार अनारक्षित जागांवर निवडून आले.[11] नंतरच्या काळात मात्र केवळ आरक्षित जागांवरच अनुसूचित जमातीचे लोक निवडून आलेले दिसतात.

लोकसभेप्रमाणेच स्थानिक पातळीवर आदिवासी लोकांचा राजकीय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून लोकशाहीचे विकेंद्रीकरण करून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जमातीच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे समाजातील सर्व

घटकांना प्रतिनिधीत्व करण्याची संधीही देण्यात आली आहे. आदिवासी समाज हा प्रामुख्याने ग्रामीण व डोंगराळ भागात राहतो त्यांच्या पर्यंत विकास पोहचण्यासाठी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचे खूप मोठे योगदान आपणास दिसून येते. त्याप्रमाणे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामध्येही आदिवासी समाजाला प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून आरक्षणाची तरतूद करुन नेतृत्वाची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. आदिवासी समाजाला घटनात्मक राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून राजकारणात प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे.

मात्र देश व महाराष्ट्राच्या अनेक मतदार संघात आदिवासी समाजाचा प्रभाव निर्णायक असूनही त्याप्रमाणात आदिवासींमधून कणखर नेतृत्व तयार होऊ शकले नाही. विधानसभेतही त्यांच्यातून नेतृत्व पुढे येऊ शकले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही आरक्षित जागेच्या व्यतिरिक्त आदिवासी उमेदवार निवडणूक लढतांना दिसत नाहीत. आरक्षणाच्या तरतूदीमुळेच आज किमान काही आदिवासी लोक राजकीय प्रवाहात येऊ लागले आहेत.[12] मात्र आदिवासी समाजातील गरीबी, दारिद्रय शिक्षणाचे अल्प प्रमाण यामुळे आदिवासी समाजाचा राजकारणाकडे पाहण्याचा उदासिन दृष्टीकोन असल्याचे दिसून येते. राजकीय आरक्षण असूनही आदिवासी समाज विकासापासून कोसो दूर असल्याचे दिसून येते.

आदिवासींच्या राजकीय सहभागावर परिणाम करणारे घटक:-

1. शिक्षणाचे अल्प प्रमाण:- आदिवासींमध्ये मुळातच शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. 2011 च्या जनगणनेनुसार त्यांचा साक्षरता दर हा 59 टक्के इतका होता. जो भारताचा राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा (73%) कमी असलेला दिसतो. शिक्षण आणि राजकारण यांचा सहसंबंध असतो. आदिवासी राजकीय नेतृत्व राज्यघटनेतील आरक्षणामुळे अस्तित्वात आलेले दिसून येते. आदिवासी नेतृत्वाचे शिक्षणही फारसे झालेले नसते त्यामुळे त्यांचा राजकारणात प्रभाव पडत नाही. राजकीय वारसा व राजकीय सामाजिकरण चांगल्या प्रकारे झालेले नसल्यामुळे आपले राजकीय हितसंबंधांची पूर्तता या नेत्यांना करता येत नाही.

2. राजकीय पक्षाचा प्रभाव:- आदिवासी नेतृत्वाचा राजकारणात स्वतंत्र अस्तित्व दिसत नाही. कोणत्यातरी राजकीय पक्षामार्फत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या मतदार संघात आपला उमेदवार उभा केला जातो. त्यामुळे अशा आरक्षित जागेवर राजकीय पक्षाकडून उभा राहिलेला उमेदवार हा मतदार संघातील लोकांना उत्तरदायी असण्यापेक्षा राजकीय पक्षाचे हितसंबंध जोपासण्यावर भर देतो. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, लोकसभा, विधानसभेत आरक्षित जागेवर आदिवासी नेतृत्व निवडून दिले जाते. मात्र प्रस्थापित सत्ताधारी राजकीय नेतृत्वाच्या सल्ल्यानुसार ते काम करतात. आदिवासींच्या समस्यांचे निराकरण त्यांना करता येत नाही. 78 टक्के आदिवासी नेते आदिवासींच्या अडीअडचणीच्या काळात धावून जात नाहीत. तसेच 81 टक्के आदिवासी नेत्यांना आदिवासी प्रश्नांविषयी तळमळ नसल्याचे संशोधनात आढळून आले आहे.[13]

3. राजकीय उदासिनता:- आदिवासी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय उदासिनता दिसून येते. अनुसूचित जमातीमध्ये प्रत्येक जमातीनुसार राजकीय संघटन होतांना दिसत नाही. महादेव कोळी, कोकणा, ठाकर, भिल्ल अशा काही जमातींचे राजकीय संगठन आहे मात्र 67 टक्के आदिवासी संगठन हे समाजाचे कार्य करत नसल्याचे संशोधकाला आढळले आहे.[14] त्यांचे राजकीय सामाजीकरण झालेले नाही पर्यायाने त्यांना आपले प्रश्न व समस्या यांची सोडवणूक करता येत नाही.

4. रूढी, प्रथा परंपरांचा प्रभाव:- आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणात रूढी, प्रथा, परंपरांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. प्रत्येक जमातीमध्ये जात पंचायत आहे. या जात पंचायतीमध्ये आपआपल्या जमातीतील लोकांच्या न्यायनिवाड्याचे काम केले जाते. आधुनिकीकरणाचा प्रभाव त्यांच्यावर जाणवत नाही परिणाम त्यांचे राजकीय विश्व आजही परंपरागत जात पंचायतीभोवती फिरताना दिसून येते. आदिवासींमध्ये आजही जात पंचायत प्रबळ असल्याने त्यांच्यात आधुनिक राजकीय अस्मिता व आकांक्षांचा अभाव दिसतो. ज्यामुळे ते राजकारणात सक्रीय होत नसल्याचे दिसून येते.

आदिवासी समाजाचा राजकीय सहभाग वृध्दीसाठी उपाय:-

1. आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे आहे. शिक्षण आणि राजकारण यांचा सहसंबंध आहे. शिक्षणामुळेच व्यक्तीच्या जाणीव जागृती होतात व स्वत:चे बरे-वाईट काय हे समजते. शिक्षणाद्वारे स्वत:च्या हितसंबंधाची पूर्तता करता येईल.
2. राजकीय पक्षाने आपले वर्चस्व आदिवासी उमेदवारावर न लादता त्याला आपल्या पध्दतीने काम करण्याची मुभा द्यावी. आदिवासी उमेदवाराच्या राजकीय आकांक्षांना बळ मिळण्यासाठी प्रयत्न करावेत.
3. अनुसूचित जमातीच्या जागेवर निवडून आलेले नेते हे आदिवासी लोकांना उत्तरदायी असण्यापेक्षा राजकीय पक्षाला उत्तरदायी असल्याचे दिसून येते. ज्यामुळे आदिवासी समाजाच्या राजकीय अपेक्षा, आकांक्षा व अस्मिता धुळीस मिळते. राजकीय नेते व पक्ष संघटनांकडून आदिवासींचे प्रश्न सुटत नसल्यामुळे अनेक आदिवासींनी नक्षलवादाचा मार्ग पत्करला आहे.[15] त्यामुळे राज्याने आदिवासींचे प्रश्न प्राधान्याने सोडवले पाहिजेत.
4. आदिवासी समाजात राजकारणाविषयी उदासिनता दिसून येते. आदिवासींमध्ये राजकारणाविषयी जाणीव जागृतीसाठी त्यांचे राजकीय सामाजिकरण करण्याची गरज आहे. तेव्हाच आदिवासी समाजाचा राजकीय सहभाग वाढू शकतो.
5. आदिवासी समाजात आजही जातपंचायतीचे स्वरूप प्रबळ आहे. जातपंचायती भोवती आदिवासींचे राजकीय जीवन असलेले दिसते. जात पंचायतीवरील न्याय निवाळ्यावरती कायद्याने बंदी आणली पाहिजे. तर राज्य व्यवस्था व न्यायपालिकेवरील आदिवासींचा दृढ विश्वास निर्माण केला पाहिजे.

सारांश:-

आदिवासी जमाती जगभर आढळतात. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीमुळे आदिवासींनी आपले अलगत्व टिकवून ठेवले आहे. आदिवासी समाज सामाजिक-आर्थिक दृष्टीने मागास असलेला दिसतो. आदिवासी समाजाच्या विकासासाठी व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांचा राजकीय सहभाग वृध्दीसाठी राज्यघटनेत काही

तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्यात राजकीय आरक्षणाची तरतूद सर्वात महत्वाची असून राजकीय आरक्षणामुळेच आदिवासींना राजकीय निर्णय प्रक्रीयेत सहभाग घेण्याची संधी प्राप्त झाली आहे. राजकीय आरक्षणाव्यतिरिक्त इतर जागांवर आदिवासी समाजातून प्रतिनिधित्व दिले जात नाही. त्यामुळे आदिवासींचा राजकीय सहभाग वृध्दीसाठी राजकीय आरक्षण महत्वपूर्ण साधन ठरले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही आदिवासींचा राजकीय सहभाग वाढत असून अजूनही आदिवासींमधील राजकीय उदासिनता, रूढी, प्रथा परंपरांचा प्रभाव, राजकीय महत्वाकांक्षेचा अभाव यामुळे आदिवासींचा राजकीय सहभागात अडथळे निर्माण होतात. आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार करून त्यांचे राजकीय सामाजिकरण करून आदिवासींचा राजकीय सहभाग वाढवता येऊ शकतो व आदिवासींचे सक्षमीकरण करणे शक्य आहे.

संदर्भसूची-

तेगमपुरे, मारोती. *(2009). आदिवासी विकास आणि वास्तव.* औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन, पृ. क्र. *14*

Utpreti, Harishchandra. 1970. Indian Tribes Samajik vigyan Hindi Rachna Kendra, New Delhi: Rajasthan Vishwavidyalaya, PP. 1.

Hutton, J.H. 1938. Census Report of India 1931, Vol. 1 New Delhi. P. 1

Elwin, V. 1939. The Baiga, London: Macmuliam publication PP.519.

Ghurye, G.S. 1943. The Aborigines so-called and their future, Poona : Published by D.R. Gadgil, PP.36.

Census of India. (2011). Scheduled Tribes in India As revealed in Census 2011. Ministry of Tribal Affairs, Government of India. https://tribal.nic.in/Statistics.aspx

गारे, गोविंद. *(1999). आदिवासी विकास योजना- संकलन व संपादन.* पुणे: आदिवासी विकास प्रतिष्ठान, द्वितीय आवृत्ती, पृ. क्र. *52*

गारे, गोविंद. *(2000). 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती (सामाजिक व सांस्कृतिक मागोवा)'.* पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृ. क्र. *1*

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांचे राज्यनिहाय विभाजन *https://www.mea.gov.in/Uploads/PublicationDocs/19167_State_wise_seats_in_Lok_Sabha_18-03-2009.pdf*

Ambagudia, Jagannath (2019). Scheduled Tribes, Reserved Constituencies and Political Reservation in India. Journal of Social Inclusion Studies, 5(1), 44-58. https://doi.org/10.1177/2394481119847015

Prasad A. (2001). Reservation policy and practice in India: A means to an end. *New Delhi: Deep and Deep Publications, Pg. No. 77*

Ambagudia, Jagannath. (2019). उपरोक्त

दुधाने , प्रल्हाद. *(2013). 'नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी'.* डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध.

दुधाने , प्रल्हाद. *(2013).* उपरोक्त.

मिश्रा, स्तुती. *(2022).* भारतीय राजकारणातील आदिवासी समुदायांची स्थिती. *https://politicsforindia.com/status-of-tribal-communities-in-indian-politics/*

Cite Your Article as:

Dr. Arjun Ubale & Shri Gore Pandurang Sitaram. (2024). BHARTATIL ADIWASHICHA RAJKIY SAHBHAG : EK CHIKITSAK ADHYAYAN. In Scholarly Research Journal for Interdisciplinary studies (Vol. 12, Number 82, pp. 78–87). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.11076986

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language